# जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

**" जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी "** पद कंत्राट पध्दतीने भरण्यासाठी **जाहिराती**

**<u>दूसरी वेळ</u>**

जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांचे कार्यालयातील **" जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी "** हे पद कंत्राट पध्दतीने भरण्याकरिता दिनांक **२/४/२०११** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | पदाचे नाव : | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी |
| २. | पदसंख्या | एक |
| ३. | कंत्राट कालावाधी: | पुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपात, एक वर्ष कालावाधीसाठी. |
| ४. | ठोक वेतन : | २२०००/- प्रती महिना (या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय नाही) |
| ५. | शैक्षणिक अर्हता: | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी / पदव्युतर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन) |
| ६. | अनुभव : | १) आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्रधान्य देण्यात येईल.<br>२) मराठी व इंग्रीजी भाषेचे चांगले ज्ञान असणे इष्ट<br>३) टिप्पणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य |

**७. अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे बंधकारक आहे.**

१. किमान शैक्षणिक अर्हता व त्यावरील शैक्षणिक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक व प्रमाणपत्र
२. शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला
३. आपत्ती व्यवस्थापनातील अनुभवाचे प्रमाणपत्र
४. शासकीय कामाच्या अनुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र
५. प्रकल्प हाताळण्याचा पुर्वानुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.
६. अधिवास प्रमाणपत्र
७. लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

**<u>८. पात्रतेच्या अटी व शर्ती :-</u>**

१. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्य करण्यात येईल.
२. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही स्तरावर रद्य करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे रहातील. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती देणे, जिल्हाधिकारी कार्यालयावर बंधनकारक राहणार नाही.
३. अंतिम निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती देण्याचे झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय औरगाबाद येथे नियुक्ती देण्यात येईल. उमेदवारास महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत जिल्हयात राबविण्याचा जिल्हा, तालुका व गाव पातळीवरील आराखडे निर्मिती, विविध अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण व उदबोधन तसेच वेगवेगळया स्तरावर जनजागृती करणे व या कार्यक्रम अंतर्गत जिल्हाधिकारी यांनी दिलेले निर्देशानुसार काम करणे बंधनकारक राहील.

४. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

५. उमेदवाराने त्याच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

६. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने त्यांच्या नियुक्तीचा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसात पदावर हजर होण्याचे आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती आपोआप रद्द होईल व ते पुढील नियुक्तीस अपात्र ठरतील. तसेच निवड सुचितील प्रतिक्षायादीनुसार पुढील पात्र उमेदवारास नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीच्या टिकाणी उमेदवाराने स्वखर्चाने रुजू होणे अनिवार्य आहे.

७. मुळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु करुन घेण्यात येईल.

८. नियुक्तीनंतर एक वर्ष किंवा नियुक्ती आदेशात नमूद करण्यात येणाऱ्या त्यापेक्षा कमी कलावधी संपल्यानंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. किंवा जिल्हाधिकारी यांना वाटल्यास कामाच्या गुवत्तेनुसार मध्यंतरीसुध्दा नियुक्ती संपुद्वटात आाता येतु शकेल.

**९. विशेष सुचना :-**

१. नमूना अर्ज **http://www.aurangabad.nic.in** वेबसाईडवर उपलब्ध आहे. उमेदवाराने आपले अर्ज ए-४ साईजच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखीत हस्तलेखीत करुन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत, लेबरकॉलनी, औरंगाबाद या पत्यावर जाहिराती प्रसिध्दी झाल्याचे दिनांकापासून ते **दिनांक २/४/२०११ पर्यंत पहोचतील अशा रितीने पोस्टाव्दारे पाठवावे.** या काळावाधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या अर्जाचाच (विहित नमुन्यातील अर्जाचा ) विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख **" जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी "** असा करावा. अर्जावर अर्जदाराची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

२. जाहिरातीपुर्वी व जाहिरातमध्ये दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त तसेच अपुर्ण, अर्धवट रीत्या भरलेले, चुकीचे भरलेले अर्ज काही त्रुटी आढळून आल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

३. अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

४. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखातीचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

५. भरती प्रक्रिये संदर्भात न्यायालयीन दाव्याचे कार्यक्षेत्र औरंगाबाद राहील.

६. एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतिम निर्णय इत्यादीबाबतचे संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी राखुल ठेवला आहेत.

७. पात्र ठरलेल्या उमेदवारांची मूलाखात घेण्यात येईल. सदर मुलाखातीचा दिनांक हा स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

८. मुलाखातीसाठी स्वखचाने यावे लागेल.

९. मुळ प्रमाणपत्र मुलाखातीच्या वेळी सोबत घेवून यावे.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती, औरंगाबाद**

**<u>जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी</u>**
**अर्जाचा नमुना**

| पासपोर्ट साईज अलीकडील फोटो |
|---|

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती, औरंगाबाद
जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत,
लेबर कॉलनी, औरंगाबाद ४३१ ००१

पदाचे नाव : **<u>जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी</u>** या पदाचा अर्ज :

जाहिराती क्रमांक :-----------------------
१. संपुर्ण नाव (मराठीत)------------------------------------------------------------
आडनाव स्वतःचे नाव वडील/पतीचे नाव
**२.** पत्र व्यवहाराचा पत्ता-----------------------------------------------------------------
**३.** दुरध्वनी व मोबाईल क्र-----------------------------------------------------------------
४. लिंग : ( पुरुष ) / ( स्त्री )
५. अर्जदाराची जन्म तारीख(शालांत प्रमाणपत्रानुसार)------------------------------------
५अ. दि ३१/१/२०११ रोजी होणारे पुर्ण वय------------------------------------------
६. वैवाहीक स्थिती :- **(विवाहित) / ( अविवाहित)**
७. महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? ------------------------------------------------
८. शैक्षणिक अर्हता व अनुभव :-

| अ क्र | शैक्षणिक आर्हता (उतीर्ण झालेल्या परिक्षांचा तपशिल) | परीक्षेचे नाव | उतीर्ण वर्ष | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| अ | माध्यमिक शालांत परिक्षा | | | | |
| ब | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा | | | | |
| क | पदवी/पदंव्यत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे) | | | | |
| ड | अतिरिक्त शैक्षणिक अर्हता असेल तर ते विषयंसह नमूद करावे | | | | |

९. पुर्वानुभव (शासकीय / खाजगी) :-

| अ क्र | कालावाधी | आदेश क्र व दिनांक | केलेल्या कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

पुर्वानुभव असल्यास संबंधित कार्यालयाचे/संस्थेचे दाखला/ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

९अ. आपत्ती व्यवस्थापनातील अनुभव :-

| अ क्र | कालावाधी | आदेश क्र व दिनांक | केलेल्या कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

संबंधित कार्यालयाचे/संस्थेचे दाखला/ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१०. संगणक अर्हता :-----------------------------------------------------------

११. भाषेचे ज्ञान : मराठी हिंदी इंग्रजी

१२. इतर अर्हता :

जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून याचा भंग केल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यामध्ये माझी उमेदवारी रद्द होईल याची मला जाणीव आहे. अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव माझ्याकडे आहे. मी असे प्रमाणित करतो /करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोटया माहितीच्या आधारे मिळालेली उमेदवारी किंवा निवड/नियुक्ती रद्द होण्यास पात्र राहिल. माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**दिनांक : / /२०११** **अर्जदाराचे नाव व सही**

**ठिकाण :**

---

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील नमुना अ (नियम ४ पहा)**

मी श्री/श्रीमती/कूमारी ______________ श्री ______________ यांचा/यांची मुलगा / मूलगी /पत्नी ______________ वय ________ वर्ष राहणार ______________ या व्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१) मी ______________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ________ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ________ आहे.(असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

(१) ______________ (२) ______________ (३) ______________

हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्मला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होउ शकतो मला जाणीव आहे.

**दिनांक : / /२०११** **अर्जदाराचे नाव व सही**

**ठिकाण :**

## परिशिष्ट (अ)

खालील कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती जोडली आहे [✓] मध्ये अशी खुण करावी.

| | | |
|---|---|---|
| १. | शाळा सोडल्याचा दाखला | |
| २. | शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र व गुणपत्रिका | [ ] |
| ३. | संगणक परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणात्र | [ ] |
| ४. | पुर्वानुभवाचा दाखला / प्रमाणपत्र | [ ] |
| ५. | आपत्ती व्यवस्थापनातील अनुभवाचा प्रमाणपत्र | [ ] |
| ६. | विवाहित महिला उमेदवारांचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा विवाहनंतर नावामध्ये झालेल्या बदलाबाबातचे प्रतिज्ञापत्र | [ ] |
| ७. | अर्जदार शासकीय / निम शासकीय सेवेत कार्यरत असेल तर अशा उमेदवारांचे संबंधित कार्यालयाचे नियुक्ती प्राधिकाऱ्यांची पुर्वपरवानगीचे पत्र | [ ] |
| ८. | आपत्ती व्यवस्था अंतर्गत प्रकल्प हाताळण्याचा पुर्वानुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र. | [ ] |

---